Jagdamba Education Society's

# Santosh N. Darade Polytechnic

At.Babhulgaon, Tal.Yeola, Dist.Nashik- 423 401

## * Central Library *

Please Consider the Environment Before Printing…

**Date: 25/04/2025**

## Activity Name: Day Special

## दिन विशेष

**News Paper Name: आपलं महानगर**

**Page No. 04**

# दिनविशेष



## मराठी, हिंदी चित्रपट अभिनेते शाहू मोडक

शाहू मोडक हे एक भारतीय अभिनेते होते ज्यांनी अनेक हिंदी तसेच मराठी चित्रपटांमध्ये काम केले. शाहू मोडक हे प्रामुख्याने त्यांनी साकारलेल्या पौराणिक पात्रांसाठी प्रसिद्ध होते. शाहू मोडक यांचा जन्म २५ एप्रिल १९१८ रोजी अहमदनगर येथील एका मराठी ख्रिश्चन कुटुंबात झाला. शाहू मोडक यांचा पहिला चित्रपट 'श्यामसुंदर' आणि मुख्य म्हणजे पुण्यात निर्माण झालेला हा पहिला बोलपट होता. भारतीय चित्रपटसृष्टीच्या इतिहासात रौप्यमहोत्सवाचा पहिला मान 'श्यामसुंदर'ला मिळाला. मुंबईच्या 'वेस्टएन्ड' (नाझ) या चित्रपटगृहात तो सलग २७ आठवडे पडद्यावर झळकत होता. 'श्यामसुंदर'ची याशिवाय इतरही अनेक वैशिष्ठ्ये होती. भारतातला तो पहिला 'बाल चित्रपट'. शिवाय मराठीसोबत त्याची हिंदी व बंगाली आवृत्तीही काढण्यात आली होती.

शाहू मोडक हे नाव घेतले की समोर संत ज्ञानेश्वर व भगवान श्रीकृष्ण यांच्या प्रतिमा आजही समोर येतात. जन्माने ख्रिश्चन असूनही शाहू मोडक यांनी संत ज्ञानेश्वर व भगवान श्रीकृष्ण यांच्या भूमिका उत्तमरित्या साकारल्या. ते ज्ञानेश्वरांची भूमिका शब्दश: जगले. संत ज्ञानेश्वर, माझा मुलगा, माणूस अशा २९ चित्रपटांत त्यांनी कृष्णाची भूमिका साकारली. त्यामुळे मराठी चित्रपटसृष्टीत शाहू मोडक अद्वितीय व्यक्तिमत्त्व होते. रूपेरी पडद्यावर तर शाहूरावांनी अनेक विक्रम प्रस्थापित केलेच. माणूस, औट घटकेचा राजा, श्यामसुंदर, अमर समाधी, नरसी मेहता, झाला महार पंढरीनाथ अशा अनेक चित्रपटांमधील त्यांच्या भूमिका अजरामर ठरल्या. अध्यात्म, तत्त्वज्ञान, ज्योतिष यांमध्ये रस असणारे शाहू मोडक व्याख्यानांद्वारे विवेकानंदांच्या तत्त्वज्ञानाचा प्रसार करत असत. शाहू मोडक यांचे ११ मार्च १९९३ रोजी निधन झाले.

Nashik Edition

Apr 25, 2025 Page No. 4

Powered by: erelego.com

LIBRARIAN
MR.U.D. MULANI
SND POLYTECHNIC
YEOLA-423401

PRINCIPAL
PROF.U.B JADHAV
SND POLYTECHNIC
YEOLA-423401